जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२४ दिनांक :- १२ नोव्हे., २०२४

**जळगाव दि.१२ ( ) तेलंगाणा राज्यातील फुलांचा उत्सव, आंध्र प्रदेशचे लोकनृत्य, गोवाचे वारकरी नृत्य, महाराष्ट्राचे लेझीम व महाराष्ट्रीय वेशभूषा सादर करीत भारतीय एकात्मतेचे दर्शन दाखविणाऱ्या शोभा यात्रेमुळे विद्यापीठाचा परिसर मंगळवारी सायंकाळी भारावून गेला.**

निमित्त होते दि.१२ नोव्हेंबर पासून विद्यापीठ परीसरात सुरु झालेल्या पश्चिम विभागीय राष्ट्रीय सेवा योजना पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड शिबिराचे. १० दिवसाच्या या शिबीराला उदघाटनाआधी शोभायात्रेने प्रारंभ झाला. विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशव्दारापासून सायंकाळी ४.३० वाजता कुलगुरु प्रा.व्ही. एल. माहेश्वरी यांनी या शोभायात्रेला हिरवी झेंडी दिली.

भारत सरकारचे युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय आणि रासेयोचे विभागीय संचालनालय पुणे व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर सुरु झाले आहे. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगना, गुजरात, दमन, दादरा-नगरहवेली, गोवा या सात राज्यातील २०० रासेयो स्वंयसेवक शिबिरात सहभागी झाले आहेत.

शोभायात्रेत रासेयो स्वयंसेवक उत्साहाने सहभागी झाले होते. आपल्या प्रदेशातील संस्कृती आणि अस्मिता दर्शविणारी वेशभूषा, घोषणा यामुळे परिसर दणाणून गेला होता. तेलंगाणाच्या विद्यार्थिनींनी बदकम्मा व बोनालू हे नृत्य तर विद्यार्थ्यांनी डप्पू बँड सादर केला. आंध्रच्या रासेयो स्वयंसेवकांनी पंचकट्टू लोकनृत्य सादर केले. गोवाचे विद्यार्थी वारकरी होऊन नृत्य सादर करतांना दिसले. महाराष्ट्राच्या संघाने लेझीम सादर केले. प्रशासकीय इमारतीजवळ शोभायात्रेची सांगता झाली. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्रा. अनिल डोंगरे, प्रा.म.सु.पगारे, प्रा.सुरेखा पालवे, प्रा. पवित्रा पाटील, सीए रवींद्र पाटील, रासेयो प्रादेशिक संचालक अजय शिंदे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, युथ ऑफीसर सुमंतकुमार यादव, सिनेट सदस्य नेहा जोशी, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे यांच्यासह प्रा.संजय शिंगाणे, प्रा. किरण कुलकर्णी, डॉ.दिनेश पाटील, प्रा.योगेश पुरी, प्रा.मनीष करंजे, प्रा.पांडुरंग पाटील, प्रा.मनोहर पाटील, शरद पाटील आदी उपस्थित होते.

..........................................................................................

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बा**तमी/२०२४ दिनांक: १२ नोव्हेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२४ दिनांक :- १२ नोव्हे., २०२४

**जळगाव दि.१२ ( ) पारंपरिक शिक्षणात निरीक्षण आणि विश्लेषण क्षमता वृध्दींगत करण्याचा मुख्य उद्देश असला तरी त्यासोबतच नैतिक मूल्य देखील शिक्षणाव्दारे वाढविण्याची गरज असून त्यातूनच सुदृढ राष्ट्रनिर्मिती होईल असा विश्वास कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी व्यक्त केला.**

पश्चिम विभागीय राष्ट्रीय सेवा योजना पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड शिबिराचे उद्घाटन करतांना प्रा.माहेश्वरी बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रासेयो प्रादेशिक संचालक अजय शिंदे उपस्थित होते. मंचावर प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.सुरेखा पालवे, प्रा. म.सु.पगारे, प्रा. अनिल डोंगरे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, युथ ऑफीसर सुमंतकुमार यादव, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते.

प्रा.माहेश्वरी म्हणाले की, आम्ही शिक्षणातून केवळ मानवी रोबोट निर्माण करीत आहोत का. कारण सामाजिक संवेदना आणि नैतिक मूल्य कमी होतांना दिसत आहे. युवाशक्तीच्या उर्जेला योग्य दिशा देण्याची गरज आहे. पारंपरिक शिक्षणासोबतच आमची संस्कृती, परंपरा, मैत्री याबाबतीतील भावना व संवेदना वाढविण्याची गरज आहे. त्यासाठी नैतिक मूल्य पेरावे लागतील. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सुरु असलेल्या कामाबद्दल त्यांनी गौरव करतांना यातून राष्ट्रनिर्माण करण्यात रासेयोचा सहभाग मोठा असल्याचे सांगितले. या शिबीरातून विविध राज्यातील संस्कृती, भाषा, परंपरा, वेशभूषा यांची ओळख करुन घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

अजय शिंदे यांनी आपल्या भाषणात या शिबीरातून ४४ रासेयो स्वयंसेवकांची अंतिम निवड केली जाणार असून त्यामध्ये शारिरीक तंदुरुस्ती, परेड मधील कामगिरी, सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग व मूलाखत या निकषांव्दारे तज्ज्ञांकरवी ही निवड पारदर्शी पध्दतीने केली जाणार असल्याचे सांगितले.

प्रारंभी रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी प्रास्ताविकात रासेयोच्या उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो जिल्हा समन्वयक डॉ.दिनेश पाटील यांनी केले. कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी आभार मानले.

.................................................................................................................................

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बा**तमी/२०२४ दिनांक: १२ नोव्हेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी